# समाजाची पार्श्वभूमी

इ. स. पूर्व ७००० वर्षे पुर्वी वैदीक भाषा बोलली जात होती. इ. स. पूर्व ७००० ते १००० वेदब्राम्हणे आरण्यके उपनिषधे या ग्रंथाचा, वैदिक संस्कृतीचा कालखंड होता. ही संस्कृत भाषा वरिष्ठ वर्गाची आणि पुढे नाना विदयांची भाषा बनली तरी प्राकृत भाषांची परंपरा लुप्त झाली नव्हती.

इ. स. 1000 ते इ. स. पुर्व 200 पाणिनीय अथवा लौकिक भाषा या देशात सुरू झाली. आणि लौकिकाशी जनसामान्यांनी आपला संपर्क वाढविला नाही तर यज्ञ संस्कृतीचे संगोपन आपण करू शकणार नाही. आणि सामान्य समाजावरील आपले वर्चस्व आपण अबाधित राखू शकणार नाही. या स्वार्थी हेतुसाठी नाटकातून करमणुकीच्या विविध साधनातून स्त्रियांच्या आणि सेवकांच्या तोंडी जनसामान्यांची भाषा वापरण्यास सुरूवात केली पण धर्मग्रंथाच्या अभ्यासासाठी मात्र सामान्य समाजाला परवानगी नाकारली धर्माचे हे गुप्त व्यवहार सामान्य लोकाना आधिकच कुतुहलाचे वाटू लागले इश्र्वरीय अस्तित्वाविषयीची तात्विक चर्चा आणि ज्ञान आपल्याला कळाले पाहीजे असे सामान्य समाजाला उत्कटतेने वाटले तेव्हा महावीर व गौतम बुद्ध यांनी प्राकृत भाषेमध्ये ग्रंथ निर्माण करून त्या भाषांचा समाजाच्या विकासासाठी आणि संघटनासाठी वापर सुरू केला आणि तेव्हापासून आर्याची संकृती आणि आर्येतरांची संस्कृती असे दोन प्रवाह प्रामुख्याने या देशात सुरू झाले. आणि वारंवार स्वतःला वरिष्ठ समजणाऱ्या उच्चवर्णीयांना धडका देत बाजूला सारीत धर्मभावनेचा वेध घेत बहुजन समाज संघटीत होत गेला याच कालखंडात म्हणजे सुमारे अडिच हजार वर्षापुर्वी सिंधू नदीच्या किनाऱ्यावर सुरू झालेल्या भज– भजती म्हणजे भक्ती करणाऱ्यांचा म्हणजे भागवतांचा एक मेळा स्वाभाविकरित्या संघटीत होत गेला. उत्कट इश्वर प्रेमाने अत्यंत स्पष्टपणे महादेवाची म्हणजे शिवलिंगाची पूजा अर्चा स्वीकारली आणि सातत्याने प्रयत्न केला. या काल्पनिक देवांना शह देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. या भागवत पंथाचे प्रांतिक प्राकृतजनाचे विविध नावाने

निरनिराळे प्रवाह भारतात निर्माण झाले. पंजाब, बंगाल, गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक या ग्रंथातून ठळक स्वरूपात गुरूनानक, कबीर,चैतन्य प्रभू नरसी मेहता, महानुभावांचा चक्रधर आणि वारकरी ज्ञानेश्वर व तुकाराम आणि बसवेश्वर अशा बहुजन समाजाचे हित इच्छिणाऱ्या लोकानी प्राकृत धार्मिक प्रवाहांना संघटित केले महाराष्ट्रातील श्री विठ्ठल या भागवत संप्रदायाचा ठळक श्रेष्ठ आणि वेदवाङ्मयातील भेद नीती परखडपणे उघड केली त्यामुळे लोकांना धीटपणा प्राप्त झाला. बौद्ध, महावीर या दोन पंथाना शह देणारा वैदिक संस्कृतीचा एक प्रचंड ताकदीचा हिंदूचा आचार्य केरळमध्ये जन्माला आला. आणि नास्तिकांचे बंड मोडून काढण्यासाठी तसेच आर्यांचे संघटन घट्ट करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आर्य शंकराचार्यांनी जीवाचे रान केले. यांना आद्य शंकराचार्य म्हणतात.

शंकराचार्यांच्या आयुष्याच्या प्रारंभकाळात ज्ञानसाधना, तपःसाधना पूर्ण करून जनजागरणाची मोहिम त्यांनी हाती घेतल्यावर काही प्रसंग घडत गेले त्यातील एक प्रसंग असा एकदा एका गावात शंकराचार्यांचे प्रवचन उघडयावर सुरू हाते. आणि आपले मायावादाचे तत्वज्ञान ते आम समाजाला ऐकवत होते. माझादेह मातीचा आहे, तुमचा देह मातीचा आहे. माझा आत्मा अमर आहे, तुमचा आत्मा अमर आहे. म्हणून आपण समान आहोत. हे तत्वज्ञान म्हणून ऐकत असणारा एक धेड माणुस दुसऱ्या दिवशी सकाळी शंकरार्यांच्या आंधोळीच्या मार्गावर धीटपणे उभा राहीला. वेळ सकाळची असल्याने त्याची सावली रस्त्यावर लांब पसरली शंकराचार्य नदीवर निघाले त्यांनी धेडाकडे पाहीले नजरेला नजर मिळाली धेडाने प्रश्न केला काल रात्री आपण म्हणालात तुमचा देह मातीचा आहे, माझा देह मातीचा आहे. तुमचा आत्मा अमर आहे. माझा आत्मा अमर आहे. मग या वाटेवरच्या मातीवर माझ्या मातीच्या देहाची माती पडली आणि त्या मातीवरून तुमचा देह आंघोळीसाठी नदीवर गेला तर बिघडले कुठे?

तर्कनिष्ठ असे हे ज्ञान एका धेडाच्या बुद्धींत असे रूजलेले आणि समर्थ झालेले पाहुन शंकराचार्य आणि परिवार आश्चर्यचकित झाला संचित झाला आणि

भाग्यवानही. त्यापुढे शंकराचार्यांनी ज्ञानाची पेरणी इतक्या उघडपणे आम समाजासाठी करू नये आणि ' विश्व ब्रम्हचि केले' या नादाला लागु नये म्हणून शंकराचार्यांना उघडयावरची प्रवचने बंद करण्यास भाग पाडले. धर्म चर्चा होईल ती फक्त उच्चवर्णीयांसाठी बंदिस्त मठातून तशी मठस्थापना या देशाच्या चारी टोकांना झाली. ऋषीकेश, शृंगेरी, अशी उत्तर दक्षिण टोके आणि मग या मठांच्या उपशाखा देशांच्या मोक्याच्या ठिकाणी निर्माण करण्यात आल्या यज्ञ संस्कृतीच्या जोडीलाही मठ संस्कृती वर्णवर्चस्व, प्रस्थापित करण्यासाठी आर्यमंडळींना अत्यंत उपयुक्त ठरली आपल्या संघटनेच्या बळावर प्रत्येक मठावर राजाश्रय म्हणजे कोटयावधी रूपयांच्या इस्टेटी मिळवल्या तेव्हापासुन सत्ता आणि संपत्ती या मठांच्याकडे साठत गेली संपत्तिवर राखणदार म्हणुन भुजंग असतो. तसा हिंदू धर्माचा भुजंग या मठातून फुत्कार टाकू लागला. संपत्ती जशी वाढली. तसा हा फुत्कारही सामर्थ्यशाली झाला. कडेकोट बंदोबस्तांतील या विषारी धर्म भुंजगाला कोणत्याही प्रकारचा धोका उरला नाही. त्याचा परिणाम समाजाचे शोषण झाले. मानवता केविलवाणी होवून कुठे दूर एखादया कोपऱ्यात जाऊन बसली. कर्मकांड वाढले. कोणतेही तारतम्य उरले नाही. ३६५ दिवसात २००० व्रते साजरी करण्यात येवू लागली. व्रत वैकल्यांचा सुळसुळाट माजला. तसे जनसामान्यांचे शोषणही वाढले. निर्माण झालेल्या कृषी संपत्तिच्या वाटणीतील सर्वात मोठा हिस्सा शेतकऱ्यांकडून धर्ममार्तंड हिसकावून घेवू लागले आणि दारिद्रय मगरमिठी घालत राहीले. दैववादाचा पगडा समाजावर बसला. भीतीपोटी देवांची आराधना करून उच्चवर्णीयांसारखें आपणही लौकिक सुखाचे धनी होवू असे अज्ञानी सामान्य जनांना वाटले हरीजन वाडयात थळोबा, धनगर वाडयात विरोबा, कुणब्याच्या घरात खंडोबा असे बा निर्माण झाले.

जाखाई, जोखाई, सखाई, मरिआई, फिरंगाई अशा विविध आई निर्माण झाल्या, कुठल्या डोंगरावर आई तर बा गावात तर कुठे बा डोंगरावर तर आई गावात अशी जमेल तशी सेवा करून पूजा करून पूजा अर्चेचे स्तोम वाढीला लागले. निष्क्रियता वाढली. सार्वजनिक हिताचा विचार कमी झाला समाज विस्कळीत झाला. संघटना

संपुष्टात येत निघाले. धर्माचा खोटा आणि चुकीचा अहंकार बळावला आणि इस्लाम धर्माने या गालितगात्र कालखंडातच आपल्या धर्माचे वर्चस्व या देशावर प्रस्थापित करण्यासाठी सत्तेच्या राजकारणाचे फासच आवळले विजयनगरचे राज्य खालसा झाले. ' आसेतु हिमाचल हिंदू आणि मुसलमान' यांच्यात धर्म म्हणजे इर्षा, इर्षा म्हणजे वैर, आणि वैर म्हणजे बळाचा वापर असे जणु सुत्रच ठरून गेले. हे झगडे दोन्हीकडच्या उच्चवर्गात सुरू राहीले, उमटत राहीले लोकांना कसे जगावे यापेक्षा धर्माच्या मुर्खकल्पनेसाठी कसे मरावे याचेच ज्ञान आधिक होत गेले.. राजसत्ता आणि धर्मसता एकसमयावच्छेदे करून मानवतेवर प्रखर हल्ले करीत राहील्या. बहुजन हिताय, बहुजन सुखाय चरत भिक्कवे ' हा बाळबोध बौद्ध विचार केरासारखा बाजूला सारला गेला तरी कुठेतरी शहाणपणाचा एकक बिंदू शिल्लक राहीला. दिनेइलाही हा दोन धर्मातील ऐक्य घडवून आणणारा एका नवा विचार या देशाला अकबराने दिला. 'ऐन अकबरी' धर्मग्रंथाच्याद्वारे त्या विचाराचा प्रसार सुरू झाला.

जनसामान्यांना दिलासा मिळाला दबकत दबकत जनता मेळ्याने राहु लागली पून्हा सत्तांध आणि स्वार्थांध दोन्ही धर्मातील धर्ममंडळी म्हणजे मुल्ला मौलवी आणि उच्चवर्णीय यांची झोटिंगशाही बलवत्तर आणि मानवतेचा प्रसार करणा–या संत मंडळीवर खुनी हल्ले झाले. कापाकापी झाली मठांची जाळपोळ झाली आणि वंश श्रेष्ठत्व हीच ईश्वर सेवा मानणाऱ्या भुतावळीने सामान्य समाजाला पुन्हा एकदा विस्कळीत करून टाकले वैदिक धर्म जसा क्षीण झाला तसा इस्लाम धर्महीं क्षीण झाला आणि राजसत्ता अंधारल्या. सुपी संप्रदायाचे भगतगण समाजात इश्वरी आराधनेचे ध्येय श्रेष्ठ समजून त्याचा प्रचार करीत राहीले लौकिक सूरक्षितेच्या, सार्वजनिक हिताचा विचार मागे पडला ज्ञानहीन थिजलेल्या नजरेचा क्षीण झालेला माणूस जमेल तशी इश्वराची व नितीची आराधना करू लागला, विस्कळीतपणे जगू लागला. गुजरातेत जन्मलेला चक्रधर महाराष्ट्रात फिरतीसाठी आला विदर्भातल्या गोविंद प्रभुना पश्चिम महाराष्ट्र परका वाटला नाही. हरिजन वाडयापासून, कुणब्यांच्या वाडया, वस्त्यापर्यंत समाज म्हणण्यापेक्षा माणसे गोळा घालण्याचे काम महानुभावांनी

तळागाळात केले. आणि मग व्यासाचा मागोबा घेत भाष्यकाराते वाट पुसत ज्ञानेश्वरांनी वैदिक धर्माचेच पुन्हा काम करतो म्हणत वर्णव्यवस्था अबाधित ठेवून महाराष्ट्रात भागवतांचा मेळा चंद्रभागेच्या किनाऱ्यावर वाळवंटात संघटित करण्याचा प्रयत्न केला. १२ बलुतेदार आणि अठरा पगड जातीचे लोक आध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्यासाठी चंद्रभागेच्या वाळवंटात रिंगण धरून कीर्तनरंगी नाचू लागले चारशे वर्षे हे रिंगण घुमत आणि वाढतच गेले. संत श्रेष्ठ तुकोबांनी नवा आशय दिला.

बरे झालो देवा शुद्राघरी जन्मलो । नाहीतरी दंभेचि असतो मेलो ।

असे तुकोबा ठामपणे म्हणाले.

अणु रेणूया थोकडा । तुका आकाशा एवढा ।।

असा आत्मविश्वास प्रकट केला.

जोडोनिया धन उतम व्यवहारे । उदास विचारे वेच करी।।

असा संपत्तीवानाना इशारा दिला.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणेजो आपुले।

तोच साधु ओळखावा देव तेथेची जाणावा ।।

असा सार्वजनिक हितसंवर्धानाचा विचार धर्मकल्पनेला बहाल केला. आणि त्यासाठी प्रसंग पडला तर संघर्ष करू अशी धमकीही उच्यवार्णियांना दिली.

तुका म्हणे फासे वाघुरा कुऱ्हाडी ।

प्रसंगी जो काठी पारधी तो ।।

अशी शिकाऱ्याची भूमिका पत्करून स्वार्थी गिधाडांच्यावर तुटून पडले अनेक हल्ले सहन करून

केला जरी पोत बळेचि खाले । ज्वालातरी वरती उफाळे ।।

असे मिष्कीलपणे व उद्दाम धाडसाने उच्चवर्णियांना यांनी आव्हान दिले हा संघर्ष आणखी उग्र झाला तर आपली काही धडगत नाही असे महाराष्ट्रातील धर्ममार्तंडाना कळून चुकले. ७

## संतकालीन महाराष्ट्र

संत चळवळीचे रहस्य समजावून घ्यावयाचे तर प्रथम तत्कालीन भौतिक परिस्थितीची पार्श्वभुमी नीट बघितली पाहिजे. तेराव्या शतकाच्या अखेरीस संत चळवळ सुरू झाली त्यावेळी महाराष्ट्रात यादव कुळांतील रामदेवरायाची राजवट चालू होती. यादव सत्तेच्या भरभराटीचा काळ संपून तिला ओहोटी लागल्याची चिन्हे या अमदानीतच दिसु लागली होती. रामदेवराय हा लढवय्या पुरूष नव्हता. सातारच्या शाहु राजासारखा सुखोपभोगी, सैल व मृदु माणुस होता. हरिदासांच्या कथा, शास्त्र्यांच्या संभावना, महानुभावांचे संवाद, हेमाद्रीची व्रते – उदयापने इ. पारमार्थिक बाबतीत त्याचा सर्व वेळ खर्चिला जाऊन सैन्य व राज्य त्यांच्या तयारीकडे त्यांचे बिलकूल लक्ष नव्हते. राजपुरूषाला सर्वथा अयोग्य अशा हया वर्तनाचे दुष्परिणाम बरेच होऊन चुकले होते. परंतु ते उत्कटत्वाने दृश्यमान होण्यास शके १२१६ तील अल्लाउद्दिनाची स्वारी विशेष कारण झाली. अल्लाउद्दिनची धाड येण्यापूर्वी कर्नाटक, कोकण इत्यादी बहुतेक सर्व प्रांतातून मांडलीक राजे बेलगाम होऊन सम्राटसत्ता नांवाला मात्र राहिली होती.

महाराष्ट्रातील शेतकरी हा बहुधा स्वतःच जमिनीचा मालक होता. त्याचा मुख्य झगडा निसर्गाविरूद्ध होता. जमिनिची अल्प उत्पाद्न शक्ती हे त्याकाळी सामाजिक दुरवस्थेचे प्रबल कारण होते. शिवाय पावसाच्या अभावी वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी या दुःस्थितीत आणखी भर पडत असे.

येथील शेतकरी हा जरी परंपरेचा व रूढीचा दास असला तरी कुणाही भक्तीचा ताबेदार नव्हता राजसंस्था, वतनसंस्था, ग्रामसंस्था जातीसंस्था, धर्मसंस्था इ.

संस्थांच्या द्वारे त्यांच्या उत्पन्नातील बराचसा भाग संभावितपणे हिराऊन घेतला जाई. या सर्व संस्थांना दैवी अधिष्ठान लाभले होते त्यामुळे त्यांच्यार गुलामगिरीलाही धर्मनिष्ठेचे सोज्वळ स्वरूप प्राप्त झाले. खेडेगावातील दैनंदिन जीवनाबद्दल उदासिन असलेली राजसत्ता आपआपल्या प्रांतात स्वतंत्र व समर्थ असूनही परंपरांगत रूढीपुढे मान तुकवणारा सरंजामदार गावचा राजा असूनही ग्रामसंस्थेशी एकनिष्ठ राहणारा पाटील आणि ग्रामसंस्थेचा घटक असुनही प्रसंगी शेतकऱ्यांची पिळवणूक करणारा बलुतेदार यामध्ये मध्ययुगीन महाराष्ट्रातील सत्ता विभागलेली होती. या संस्थांना दैवी अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य मात्र ब्राम्हणशाहीने केले. 13 व्या शतकात सबंध महाष्ट्रातील बऱ्याचाशा जमीनी ब्राम्हणांनी गिळंकृत केल्या होत्या या म्हणण्यात काही हशील नाही. देवस्थानांना व ब्राम्हणांना गावे व जमीनी दान दिल्या जात. परंतू त्याचा अर्थ इतकाच की, राजा किंवा मांडलीक आपला भाग त्यांच्या स्वाधिन करीत जमीनीच्या मालकीचा यात बिलकूल संबंध नव्हता. लोकांचा धर्म भोळेपणा व बौध्दिक गुलामगिरी हाच येथील ब्राम्हणशाहीचा खरा आधार होता. जोशी हा ग्रामसंस्थेचा घटक होता. कुलकर्णी, देशपांडे, पंडीत व पुरोहित हे राजसंस्थेच्यावर अवलंबून होते. मात्र हा वर्ग शासन संस्थेच्या उत्पन्नातील भागीदार असल्यामुळे त्याने लोकांच्या मनावर जुन्या ग्रंथाची पकड कायम ठेवल्याची पराकष्ठा केली. शास्त्र प्रणित कर्मवाद व जन्मसिद्ध जातीय अवस्था यामुळे शक्तीत्वाचा विकासाला वाव उरला नाही. . आणि समाजातील कनिष्ठ वर्गावर आर्थिक गुलामगिरी येऊन भयंकर अशी मानसिक गुलामगिरी लादली. अशा रीतीने ब्राम्हणशाहीने शासन संस्थेचे हात बळकट केले व शासन संस्थेने या वर्गाच्या योगक्षेमाची काळजी घेऊन त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेला कधी धक्का लागु दिला नाही. १

भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरी यामुळे सामान्य जनता जडमुढ व अगतीक बनलेली होती या केविलवाण्या स्थितीततून तिला मुक्त करण्यासाठी संत चळवळ जन्माला आली. कोणत्याही जातीच्या मनुष्याला भक्ती पंथाच्याद्वारे आध्यात्मिक उन्नती साधता येईल. नैतिक सामर्थ वाढवता येईल प्रापंचिक दुःखांवर

मात करता येईल. असा अगदी खालच्या थरातील लोकातही या चळवळीने विश्वास निर्माण केला. त्यामुळे या संप्रदायात ब्राम्हन, कुणबी, माळी, तेली, सुतार सोनार, कुंभार, महार, इ. भिन्न जातीतील लोक सामिल झाले. वारकरी पंथातील बरेचसे भक्त ग्रामसंस्थेतील मक्तेदार मात्र या पंथाला तात्विक अधिष्ठान मिळवून देण्याचे कार्य ज्ञानेश्वर एकनाथांच्या ग्रंथाने केले आहे त्यांनी वैदिक परंपरंचा बोज राखूनच नव्या प्रक्तींना वळण लावले. संत परंपरेचा अभ्यास करताना संत वाङ्‌मयाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. ज्ञानेश्वर व एकनाथांच्या व नामदेव तुकारामाच्या वाङ्‌मयाचा थाट अगदी निराळा आहे. ज्ञानेश्वर एकनाथांच्या वाङ्‌मयात सहानुभुतीचा ओलावा आहे. दलित्तोधाराची तळमळ आहे. मानवतेचा अविष्कार आहे पण त्याचा प्रवाह एकमुखी व शांत आहे उलट इतर संताच्या अभंगवाणीत आत्मप्रकटीकरणाची धडपड आहे. त्यांच्या संतकरणात सलणारी सामाजिक जीवनातील शल्ये त्यांच्या वाङ्‌मयात अधुन मधुन डोकावल्याशिवाय राहत नाहीत. भावनेतच्या भरात ते सामाजिक विषमतेचा निषेध करतात. क्वचित बंडखोरपणाचीही भाषा बोलतात. परंतु ती तत्कालीन उर्मी ओसरताच पुनः रूढ विचारसरणीपुढे निमुटपणे मान तुकवतात. त्यांच्या वाङ्‌मयात वर्गभेदाची जाणीव आहे. पण वर्गलढयाची तीव्रता मात्र कुठेच नाही. कारण या पंथाच्या प्रवर्तकांना फक्त धार्मिक जीवनांतच समता स्थापावयाची होती. तत्कालीन समाज व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याची त्यांनां गरज भासली नाही. पण संत तुकारामाच्या आयुष्यामध्ये सामाजिक विषमतेचे भयाण वास्तव त्यांना जाणुन घेता आले आणि त्यासाठी आवश्यक तिथे संघर्ष करण्याची तयारीही तुकाराम महाराजांनी दाखविली अन्यायाने विषमते विरूद्ध बंड करून उठणे आणि समता आणि न्यायाची बूज राखणे या दोन गोष्टी निर्माण करावयाच्या झाल्या तर समाजाच्या तळापर्यंत जावून पोहचले पाहीजे याची तुकारामाना यथार्थ जाणीव होती ब्राम्हणी समाजाचा वर्चस्वाला झुगारून दयायचे असेल तर समाजाचा तळ हालला पाहीजे आणि त्यासाठी राजकीय सत्तांतरही घडले पाहीजे याचे भान तुकारामांना होते आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचालीचे योग्य ते मुल्यमापन समाजापुढे

त्यांनी केले होते याच्या नोंदी इतिहासात आज वाचावयास मिळतात सामाजिक उथ्यापनासाठी प्रगतिसाठी घडणाऱ्या घटनांची समर्थपणे नोंद घेणे येरा गबाळयाचे काम नव्हे असा विचार मनात येवून या एकाच संत कविवर दोन अभ्यासू प्राध्यापकांनी लिहलेल्या दोन ग्रंथाचा तौलनिक अभ्यास करावा चिकित्सा करावी असा विचार मनात येवून हा प्रबंध लिहण्यासाठी घेतला.